| MHKO100002322020 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :- | ०२/१२/२०१७ |
| | नोंदणी दिनांक | :- | ०२/१२/२०१७ |
| | निकाल दिनांक | :- | १०/०३/२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस |
| | | | ०८ ०३ ०८ |

**नियमीत फौजदारी खटला क्र.१४/२०२० निशाणी क्र. ५८/ब**

**फॉर्म क्र.३२**
**भाग 'अ'**
**(निकालाचे शिर्षक पृष्ठ )**
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (i) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| **गडहिंग्लज येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात**<br>**पिठासीन अधिकारी : डी.एम.पवार**<br>न्यायनिर्णय घोषीत दिनांक – १०-०३-२०२६ | | |
| गुन्हा नोंद क्र. ११२/२०१७, गडहिंग्लज पोलीस ठाणे, गडहिंग्लज. | | |
| **फिर्यादी / तक्रारदार** | :- | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>गडहिंग्लज पोलीस ठाणे, गडहिंग्लज. |
| **अभियोग पक्षातर्फे** | :- | सहाय्यक सरकारी अभियोक्ता डी.ए.पाचांळ |
| **आरोपी** | | राहुल भैरू पाटील<br>वय-२८ वर्षे, व्यवसाय-नोकरी,<br>रा.कौलगे, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर. |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | | व्ही.ए.बारदेस्कर |

**भाग-ब**
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २५/०३/२०१७ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | ३०/०५/२०१७ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | ०२/१२/२०१७ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ११/०२/२०२० |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | ०७/११/२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडलेचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतीम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राहुल भैरू पाटील | ३०.०५.२०१७ | ३०.०५.२०१७ | भा.द.वि. कलम ३५४, ५०६ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

## भाग-क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

## सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार

### अ. अभियोग पक्ष

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | अनुराधा शिवाजी पोवार | फिर्यादी | १८ |
| २. | अंजना शिवाजी पोवार | साक्षीदार | २४ |
| ३. | राधाताई शिवाजी पोवार | साक्षीदार | ३० |
| ४. | डॉ. चंद्रशेखर राजाराम देसाई | वैदयकीय अधिकारी | ३५ |
| ५. | विश्वास बापू कुरणे | तपासी अधिकारी | ४७ |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १. | दोषारोपपत्र. |
| २. | १९ | जबाब |
| ३. | २० | फिर्याद |
| ४. | ३६ | एम.एल.सी. दाखल करणेसाठी दिलेली वर्दी |
| ५. | ३७ | संमतीपत्र |
| ६. | ३८ | फिर्यादीचे डॉ. देसाई यांनी केले उपचाराबाबतचे कागदपत्रे |
| ७ | ३९ | रक्तदाब, ऑक्सीजन, पल्सरेट याचे रेकॉर्ड |
| ८ | ४० | वैदयकीय प्रमाणपत्र |
| ९ | ४८ | तपासाबाबत लेखी आदेश |
| १० | ४९ | घटनास्थळ पंचनामा |
| ११ | ५० | कॉल डिटेल्स एकत्रीतपणे |
| १२ | ५१ | कॉल डिटेल्स मागणीचे पत्र |
| १३ | ५२ | वैदयकीय प्रमाणपत्र मिळणेबाबत पत्र |

**न्या य नि र्ण य**

(दिनांक १०/०३/२०२६ रोजी घोषित केला)

**१.** प्रस्तुतच्या खटल्याअंतर्गत आरोपी यांनी भारतीय दंड संहिता कलम ३५४ व ५०६ अन्वये शिक्षेस पात्र असणा-या अपराधांकरीता संपरिक्षा दिलेली आहे.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः-**

**२.** दिनांक २५/०३/२०१६ ते २३/०५/२०१७ या कालावधीमध्ये मौजे कौलगे, ता. गडहिंग्लज गावचे हद्दीत घटना घडली. फिर्यादी एक वर्षापुर्वी

घरातून बस स्टॉपकडे जात असताना त्यांचे गावातील परटकीचा ओढा येथे ९.१५ वाजताचे सुमारास आरोपी गाडीवरून आला व त्यांने थांबवून फिर्यादीचा उजवा हात धरला व तू मला फार आवडतेस, माझे तुझ्यावर प्रेम आहे, माझेशी लग्न कर असे म्हणाला. फिर्यादीने त्याला तिचा हात सोड म्हणालेवर आरोपीने हात सोडला व तो तेथून निघून गेला. त्यानंतर आरोपीने फिर्यादीचा फोन नंबर मिळवून तिच्या फोनवर मेसेज केला.

**३.** दिनांक १९/०४/२०१७ रोजी फिर्यादी भारती बुक स्टॉल येथे कामावर हजर असताना सायंकाळी ६.०० वा. सुमारास आरोपीने फिर्यादीचे मोबाईलवर फोन करून बाहेर ये आपण बाहेर जावू असे म्हणाल्याने तीने फोन बंद केला. त्यानंतर आरोपीने पुन्हा फोन करून भेटायचे आहे असे सांगितले आणि तू भेटली नाहीस तर तुझ्या घरच्यांना मारणार असे म्हणाला म्हणून ती घाबरून आरोपीचे गाडीवर बसून वडरगे रोडने जात असताना आरोपीने गाडी थांबवली. त्यावेळी फिर्यादीने गाडी का थांबवलीस असे विचारले असता आरोपीने तिचे अंगाशी झोंबाझोंबी केली. तेव्हापासून आरोपी तिचेकडे वेळोवेळी शरीर सुखाची मागणी करत होता.

**४.** दिनांक २३/०५/२०१७ रोजी फिर्यादी नेहमीप्रमाणे दुकानात काम करत असताना दुपारी ०२.०५ चे सुमारास आरोपीने फिर्यादीचे मोबाईलवर फोन करून “ मी तुझेशी लग्न करणार नाही, तुझा माझा काही संबंध नाही व तू कोणाला काही बोललीस तर तुला व तुझ्या घरच्यांना ठार मारीन ” असे म्हणाला. तेव्हा फिर्यादीने त्याला माझे पुढे काय होणार असे विचारले तेव्हा तो “ तू जीव दे ” असे म्हणाला. त्यामुळे फिर्यादीने घरी जाताना दुकानातून कीटकनाशक औषध घेतले व घरी जावून औषधाच्या बाटलीतील विष प्यायली. त्यामुळे ती चक्कर येवून खाली पडली. त्यानंतर दिनांक २५/०५/२०१७ रोजी फिर्यादी शुध्दीवर आलेनंतर समजले की, तिला देसाई हॉस्पीलट येथे औषधोपचारासाठी दाखल केले आहे.

म्हणुन, आरोपीविरुध्द फिर्यादीने तक्रार नोंदवली.

५. सदर तक्रारीवरुन गडहिंग्लज पोलीस स्टेशनला गु.र.क्र.११२/२०१७, भारतीय दंड संहिता कलम ३५४, ५०६ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक श्री.व्ही.बी.कुरणे यांनी सदर गुन्हयाचा तपास केला. तपास पूर्ण झाल्यानंतर तपासी अधिकारी यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

६. माझे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपी विरुध्द निशाणी क्र. ०७ अन्वये वर नमुद कलमान्वये दोषारोप नोंदवून आरोप निश्चित केला. आरोपीने गुन्हा नाकबूल करुन संपरीक्षेची मागणी केली. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन निशाणी ५५ वर नोंदविण्यात आले. आरोपीचा संपुर्ण बचाव नकारात्मक स्वरूपाचा आहे.

७. अभिलेखातील साक्षी पुराव्यावरुन खालील मुद्दे खटल्याच्या विचारार्थ उपस्थित झाल्याने त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष सिद्ध करतो का की, दिनांक २५/०३/२०१६ ते २३/०५/२०१७ या कालावधीमध्ये मौजे कौलगे, ता. गडहिंग्लज गावचे हद्दीत आरोपीने फिर्यादीस लग्नाचे आमिष दाखवून दिनांक १९/०४/२०१७ रोजी तिला गाडीवरून घेवून वडरगे रोड येथे नेवून तिचा विनयभंग केला ? | नाही. |
| २ | अभियोग पक्ष सिद्ध करतो का की, वर नमुद तारीख, वेळी | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस जीवे मारणेची धमकी देवून फौजदारीपात्र धाकधपटशा केला ? | |
| ३ | काय आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमीमांसा

८.        आरोपीवरील दोषारोपाच्या शाबीतीसाठी अभियोगपक्षाने वर नमुद केल्याप्रमाणे साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे. अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ डी. ए. पांचाळ यांनी असा युक्तीवाद केला की, अभिलेखावरील पुराव्यावरून आरोपीवरील आरोप अभियोग पक्षाने सिद्ध केले आहेत. त्यामुळे आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा देण्याची विनंती त्यांनी केली आहे.

९.        आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.व्ही.ए.बारदेस्कर यांनी असा युक्तीवाद केला की, फिर्यादीने सन २०१६ मध्ये घडलेल्या घटनेची तारीख सांगितली नाही. तपासी अंमलदार यांनी फिर्यादीबाबत वेगवेगळया तारखेला वेगवेगळया घटना घडल्या असे दिसून आले नाही, असे उलटतपासात कथन केले आहे. दिनांक १९.०४.२०१७ रोजीची घटना वडरगे रोड येथे घडली तर घटनास्थळ पंचनामा कौलगे या ठिकाणी करण्यात आला आहे. यावरून अभियोग पक्षाचे खटल्याबाबत संशय निर्माण होतो. फिर्यादी एसटी ने जाणार होती, तर ती परटकीच्या ओढयाकडे का गेली याबाबत अभिलेखावरील पुराव्यावरून स्पष्ट होत नाही. आरोपीने तिचा हात धरला तेव्हा आरोपी अनोळखी होता, तरी देखील ती ओरडली नाही हे विश्वासपात्र नाही. आरोपीचे फिर्यादीवर प्रेम नव्हते त्यामुळे फिर्यादीसोबत लग्न करण्याचा प्रश्न येत नाही. त्यामुळे फिर्यादीने विष पिण्याचा प्रश्न येत नाही. अभिलेखावर दाखल केलेल्या कॉल डिटेल्स वरून फिर्यादीने कथन केल्याप्रमाणे

आरोपीने तिला फोन केले होते असे दिसून येत नाही. फिर्यादीने किटकनाशक प्यायले याबाबत कोणताही पुरावा अभियोग पक्षाने दाखल केला नाही. किटकनाशकाची बाटली व ग्लास या कामी जप्त करण्यात आला नाही. आरोपीने फिर्यादीचा विनयभंग केला हे अभियोग पक्षाच्या पुराव्यावरून सिद्ध होत नाही. त्यामुळे आरोपीस निर्दोष मुक्त करण्याची विनंती त्यांनी केली.

**मुद्दा क्रमांक १ व २ करीता –**

**१०.** सदर फिर्याद ही एकूण तीन घटनांवर आधारित आहे. त्यापैकी, पहिली घटना सन २०१६ मध्ये घडली होती. त्याची तारीख फिर्यादीस सांगता आली नाही. दुसरी घटना दि.१९/०४/२०१७ रोजी वडरगे घाटात घडली होती. तिसरी घटना दि.२३/०५/२०१७ रोजी फिर्यादीच्या घरी घडली होती. आरोपीविरूध्द भारतीय दंड संहिता कलम ३५४ व ५०६ नुसार गुन्हा दाखल आहे. त्या अनुषंगाने अभियोग पक्षाचे कथन पाहिले असता, सन २०१६ मध्ये घडलेली घटना व दि.१९/०४/२०१७ रोजी घडलेली घटना ही भारतीय दंड संहिता कलम ३५४ व ५०६ शी संलग्न असल्याचे दिसून येते.

**११.** आरोपीने फिर्यादीचा विनयभंग केला याकरिता फिर्यादीने फिर्याद (नि २०) तसेच तिचा जबाब (नि १९) व सरतपासात असे कथन केले आहे की , सन २०१६ मध्ये घरातून बस स्टॅण्डजवळ जात असताना आरोपीने तिचा हात धरून तू मला फार आवडतेस,माझे तुझ्यावर प्रेम आहे, तू माझ्याशी लग्न कर असे म्हणाला,ही घटना सकाळी ९.१५ वाजता परटकीच्या ओढयाजवळ घडली होती. तेव्हा फिर्यादीने आरोपीस हात सोड असे सांगितल्यानंतर त्याने फिर्यादीचा हात सोडला व तो निघून गेला होता.

**१२.** या घटनेस अनुसरून फिर्यादीने उलटतपासात असे कथन केले की, तिचे घर मुख्य रस्त्यावर मराठी शाळेच्या पाठीमागे आहे. या रस्त्यावर गावातील लोकांची ये–जा व वाहतुक चालु असते. बस स्टॉप शाळेच्या गेटसमोर आहे. फिर्यादी गडहिंग्लजला जाण्याकरीता बस स्टॅण्डकडे जात होती. त्यादिवशी बस ९.२५ वाजता आली होती. त्या बसमध्ये तिच्यासोबत इतर लोकही बसले होते. आरोपीने तिचा हात पकडला त्यावेळी ती ओरडली नाही. ज्यावेळी घटना घडली त्यावेळी आरोपी तिच्या ओळखीचा नव्हता. आरोपीकडे मोटरसायकल होती. परंतु तिने मोटरसायकलचा क्रमांक पाहिला नव्हता. तिने या घटनेबाबत बसमध्ये कोणालाही सांगितले नाही. तसेच तिच्या आईला व दुकान मालकालादेखील सांगितले नाही. ती घाबरली असल्याने सदर घटनेबाबत तिने तिच्या आईला देखील घरी आल्यानंतर सांगितले नाही.

**१३.** अभियोग साक्षीदार क्रमांक २ अंजना पोवार ही फिर्यादीची आई आहे. त्यांनी उलटतपासात असे कथन केले की, मराठी शाळेच्या गेटसमोर बस स्टॉप आहे. बस स्टॉप पासून पुढे चालत गेले की, परटकीचा ओढा आहे. आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये काही प्रकार चालू होता व तो किती दिवसापासून चालू होता याबाबत त्यांना फिर्यादीने सांगितले नव्हते.

**१४.** त्यानुसार घटनास्थळ पंचनामा नि.४९ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तो पंचनामा दि.१६/०६/२०१७ रोजी केला आहे. घटनास्थळ फिर्यादीने दाखवले होते. त्यानुसार दि.१९/०४/२०१७ रोजी आरोपीने फिर्यादीचा हात धरून तिच्याशी झोंबाझोंबी करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून जिवे ठार मारण्याची धमकी दिली असे सांगितले होते. घटनास्थळ परटकीच्या ओढयाजवळ रस्त्याकडेला असलेल्या चिंचेच्या झाडाजवळ होते. घटनास्थळाच्या पूर्वेस गणपती डोंगरे व त्यांच्या भावकीतील घरे,

पश्चिमेस जीवन शिक्षण विद्या मंदिर , कौलगे शाळेची इमारत ,दक्षिणेस कौलगे गावाची प्रवेशव्दार कमान व उत्तरेस कौलगे गावातुन आजरा रोडला जाणारा डांबरी रस्ता अशा चतु:सिमा नमुद केल्या आहेत. फिर्यादीच्या कथनाप्रमाणे, अशा स्वरूपाची घटना सन २०१६ मध्ये घडली होती, त्याची तारीख तिला सांगता आली नाही. परंतु, घटनास्थळ पंचनामा नि. ४९ चे अवलोकन केले असता, त्यामध्ये नमुद केलेली घटना ही फिर्यादीच्या कथनाप्रमाणे दि.१९/०४/२०१७ रोजी वडरगे घाटात सायंकाळी ६ च्या नंतर घडली होती. परंतु, त्या ठिकाणी जाऊन कोणताही घटनास्थळ पंचनामा केल्याचे दिसून येत नाही. तसेच, दि.१९.०४.२०१७ रोजी घडलेली घटना वडरगे घाटात घडली असे फिर्यादीचे कथन असताना ती घटना कौलगे येथे परीटकीच्या ओढयाजवळ घडली असे फिर्यादीने घटनास्थळ पंचनाम्यावेळी केलेले कथन चुकीचे असल्याचे दिसून येते. फिर्यादीचे घर मराठी शाळेच्या पाठीमागे होते. बस स्टॉप शाळेच्या गेटसमोर होता. बस स्टॉप पासून पुढे अंदाजे ५०० मीटर अंतरावर परटकीचा ओढा आहे असे फिर्यादीने व अभियोग साक्षीदार क्रमांक २ अंजना यांनी कथन केले आहे. असे असताना फिर्यादी बसने गडहिंग्लजला जाणार होती, त्यावेळी बस स्टॉपपासून पुढे ५०० मीटर अंतरावर असणाऱ्या परटकीच्या ओढयाकडे फिर्यादी का चालत गेली हे अभिलेखावरील पुराव्यावरून स्पष्ट होत नाही.

**१५.** दि.१९/०४/२०१७ रोजी फिर्यादी भारती बुक स्टॉल , गडहिंग्लज येथे काम करत असताना संध्याकाळी ६ च्या सुमारास आरोपीने फिर्यादीस फोन केला होता व तिला धमकी दिल्याने ती आरोपी सोबत मोटरसायकलवरून वडरगे रोडने गेली होती, तेव्हा आरोपीने घाटात एका ठिकाणी गाडी थांबवून तिच्या अंगाशी झोंबाझोंबी केली होती , असे कथन फिर्यादीने फिर्याद, तिचा जबाब व सरतपासात केले आहे. परंतु सरतपासात पुढे गल्लीत

गोंधळ नको म्हणून ती आरोपीसोबत मोटरसायकलवर बसून गेली असे कथन केले आहे. तसे कोणतेही कथन तिच्या फिर्याद (नि २०) किंवा जबाब (नि १९) मध्ये नमुद नाही.

**१६.** तपासी अंमलदार यांनी तपासादरम्यान फिर्यादी व आरोपी यांच्या मोबाईलचे कॉल डिटेल्स ( नि ५०) प्राप्त करून अभिलेखावर दाखल केले आहेत. तपासी अंमलदार यांनी उलटतपासात कॉल डिटेल्स दि.२०/०४/२०१७ पासून पुढील प्राप्त झाले आहेत असे कथन केले आहे. कॉल डिटेल्स (नि ५०) चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि.२०/०४/२०१७ पासूनचे फिर्यादी व आरोपी यांचे कॉल डिटेल्स तपासी अंमलदार यांनी प्राप्त केले आहेत. घटना दि १९/०४/२०१७ रोजी घडली होती व त्यादिवशी आरोपीने फिर्यादीस फोन केला होता असे फिर्यादीचे कथन आहे. असे असताना दि.१९/०४/२०१७ रोजीचे कॉल डिटेल्स तपासी अंमलदार यांनी प्राप्त करून घेतले नाहीत.

**१७.** तपासी अंमलदार यांनी आरोपी व फिर्यादी यांच्या मोबाईलचे कॉल डिटेल्स मिळणेकरिता पोलिस अधिक्षक, कोल्हापूर यांना दिलेल्या पत्राचे (नि.५१) अवलोकन केले असता,तपासी अंमलदार यांनी दिनांक १९.०४.२०१७ ते २४.०५.२०१७ अखेर कॉल डिटेल्सची माहिती मागितली होती. त्यानुसार त्यांना प्राप्त झालेले कॉल डिटेल्स (नि. ५०) वर दाखल आहेत. त्याचे अवलोकन केले असता ते कॉल डिटेल्स दिनांक २०.०४.२०१७ पासून दिनांक २४.०५.२०१७ पर्यत असल्याचे दिसून येते. मी त्याचे बारकाईने अवलोकन केले असता फिर्यादी व आरोपी हे एकमेकांना वारंवार फोन करत असल्याचे दिसून येते.

**१८.** दिनांक १९.०४.२०१७ रोजी आरोपीने फिर्यादीस फोन करून व धमकी देवून तिला वडरगे घाटात घेवून गेला व तिचा विनयभंग केला हे कथन

सिद्ध करण्याकरिता आरोपीने फिर्यादीस फोन केला होता याबाबत कॉल डिटेल्स अभिलेखावर दाखल नाहीत. तसेच ती घटना वडरगे घाटात घडली होती असे फिर्यादीचे कथन असताना दिनांक १९.०४.२०१७ रोजीची घटना परटकीच्या ओढयाजवळ तिच्या गावात घडली असे कथन करून घटनास्थळ पंचनामा कौलगे या गावी करण्यात आला आहे. फिर्यादीने कथन केल्याप्रमाणे परटकीच्या ओढयाजवळ , कौलगे येथे घडलेली घटना ही सन २०१६ मध्ये घडली होती,ज्याची तारीख फिर्यादीस आठवत नाही. असे असताना १९.०४.२०१७ रोजीची घटना वडरगे घाटात घडली असे फिर्यादीचे कथन आहे तर फिर्यादीने दाखवलेल्या घटनास्थळाप्रमाणे कौलगे गावी घटनास्थळ पंचनामा का करण्यात आला हे स्पष्ट होत नाही. यावरून फिर्यादीने वेगवेगळया घटनेबाबत वेगवेगळे कथन केल्याचे दिसून येते. निशाणी २० वरील फिर्याद व निशाणी १९ वरील फिर्यादी जबाब यामध्ये दिनांक २५.०३.२०१६ ते दिनांक २३.०५.२०१७ अखेर आरोपीने वेळोवळी लग्नाचे आमिष दाखवून फिर्यादीचा विनयभंग केला असे कथन आहे. दिनांक २५.०३.२०१६ ही तारीख फिर्यादीत नमुद होती तर ती तारीख फिर्यादीने सरतपासात का कथन केली नाही , तसेच तपासी अंमलदार यांनी दिनांक २५.०३.२०१६ पासून फिर्यादी व आरोपी यांचे कॉल डिटेल्स का प्राप्त करून घेतले नाहीत हे स्पष्ट होत नाही.

**१९.** त्यामुळे दि.१९/०४/२०१७ रोजी आरोपीने फिर्यादीस फोन केला होता व तिला धमकी देवून तो तिला घेवून वडरगे घाटात गेला होता व त्या ठिकाणी तिचा विनयभंग केला होता हे सिद्ध होत नाही . तसेच वर कथन केल्याप्रमाणे फिर्यादीने घटनेचे वर्णन ,घटनास्थळ व घटनेची तारीख हे वेगवेगळे कथन केले आहे. त्यामुळे फिर्यादीतील कथन तसेच सरतपास व घटनास्थळ पंचनामा यामध्ये तफावत दिसून येते. त्यामुळे फिर्यादीची साक्ष विश्वासार्ह वाटत

नाही.

२०. फिर्यादीने तिच्या उलटतपासात असे कथन केले की, दि.२३/०५/२०१७ रोजी दुपारी २ वाजून ५ मिनिटांनी तिला आरोपीचा फोन आला होता. त्यादिवशी दुपारी २ वाजून २८ मिनिटांनी व संध्याकाळी ५.१५ वाजता तिने आरोपीस फोन केला होता. त्यावेळी आरोपीने फोन उचलला होता का हे तिला आठवत नाही. अभियोग साक्षीदार क्र.३ राधाताईने तिच्या उलटतपासात असे कथन केले आहे की, फिर्यादीने शुध्दीवर आल्यानंतर सर्व सांगितले तेव्हा तिचे आरोपीवर प्रेम असल्याचे त्यांना समजले.

२१ फिर्यादीने सरतपासात असे कथन केले की, दिनांक २३.०५.२०१७ रोजी दुपारी २.१५ वाजताच्या सुमारास ती दुकानात काम करत असताना आरोपीने तिला फोन केला व “तुझा माझा काहीही संबंध नाही , तू कोणाला काही सांगितले तर तुझया घरच्यांना व तुला ठार मारेन” अशी धमकी दिली. त्यावेळी फिर्यादीने त्याला “माझे पुढे काय होणार ”असे त्याला विचारले असता तो तिला “ तू जीव दे ” असे म्हणाला. फिर्यादीने असेच कथन तिचा जबाब व फिर्याद यामध्ये केले आहे. आरोपीने फिर्यादीस नकार दिल्यानंतर “ माझे पुढे काय होईल ” या फिर्यादीने केलेल्या कथनावरून तिचे आरोपीवर प्रेम होते हे दिसून येते. तसेच अभियोग साक्षीदार क्र.३ राधाताईच्या साक्षीवरून देखील फिर्यादीचे आरोपीवर प्रेम होते हे दिसून येते. फिर्यादीच्या आईने देखील फिर्यादी व आरोपी यांच्या प्रेम संबंधाबाबत फिर्यादीने त्यांना काही सांगितले नव्हते असे कथन केले आहे. दि २३/०५/२०१७ रोजी आरोपी फिर्यादीस लग्न करण्यास नाही म्हणाला याचा राग मनात धरून फिर्यादीने सदर केस आरोपीविरूध्द दाखल केल्याचे दिसून येते.

**२२.** फिर्यादीने दिनांक २३.०५.२०१७ रोजी किटकनाशक प्यायले व त्यामुळे तिला उपचाराकरिता रूग्णालयात दाखल केले असे अभियोग पक्षाचे कथन आहे. फिर्यादीने कोणत्या दुकानातून किटकनाशक खरेदी केले याबाबत तपासी अंमलदार यांनी कोणताही तपास केला नसल्याचे उलटतपासात त्यांनी मान्य केले आहे. फिर्यादीने किटकनाशक प्यायले तेव्हा सर्वप्रथम फिर्यादीची आई व बहिण तिच्याजवळ गेले होते. फिर्यादीची आई व बहिण यांना किटकनाशकाची बाटली घरात मिळून आली नाही. तसेच तिथे ग्लास पडला होता असे फिर्यादीच्या आईने कथन केले परंतु तिथे ग्लास पडला नव्हता असे फिर्यादीच्या बहिणीने कथन केले आहे. तपासी अंमलदार यांनी फिर्यादीच्या घरातील घटनेबाबत घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा केला नाही.

**२३.** फिर्यादी किटकनाशक प्यायल्याबाबत तिच्यावर देसाई रूग्णालय, गडहिंग्लज येथे उपचार चालू होते. अभियोग साक्षीदार क्रमांक ४ डॉ.देसाई यांनी त्यांच्या उलटतपासात फिर्यादीच्या पोटातील नमुन्याची किंवा तिच्या रक्ताची तपासणी त्यांनी केली नव्हती असे कथन केले आहे. तशी तपासणी करण्यासाठी पोलिसांनी त्यांना पत्र दिले नव्हते. त्यामुळे फिर्यादी किटकनाशक प्यायली होती हे सिद्ध करण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल नाही व त्याकरीता आरोपी जबाबदार होता हे देखील अभियोग पक्षाच्या पुराव्यावरून दिसून येत नाही.

**२४.** सन २०१६ पासून फिर्यादी व आरोपी हे एकमेकांच्या संपर्कात होते हे अभिलेखावरील पुराव्यावरून दिसून येते. आरोपीने फिर्यादीस नकार दिल्याने फिर्यादीने आरोपीवर सदर गुन्हा दाखल केला असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अभिलेखावरील पुराव्यावरून आरोपी विरूध्द लावलेले आरोप सिद्ध होत नाहीत.

त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क.१ व २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे व मुद्दा क्र.३ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१ आरोपीस भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४ व ५०६ अन्वये शिक्षेस पात्र अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२ आरोपीचा जामीन कदबा व जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

३ आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७(अ) अन्वये प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/- (रुपये पंधरा हजार फक्त) चे जामीनपत्र व वैयक्तिक बंधपत्र द्यावे.

४ मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रंजना शांतीलाल सुर्यवंशी विरुध्द जयप्रकाश तुलसीराम गुप्ता, क्रिमीनल ॲप्लीकेशन नं. ३८०/२०१९ मधील क्रिमीनल अपील (एस. टी) नं. ३९०/२०१९ या न्यायनिवाडयामध्ये निर्देशित केलेप्रमाणे या न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे सत्वर पाठविण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.03.11 17:26:19 +0530

दिनांकः १०/०३/२०२६ डी. एम. पवार
ठिकाण – गडहिंग्लज. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गडहिंग्लज